पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

## प्रेसनोट दि. ०४/०७/२०२४

## पथकर सवलत पास

आषाढीवारीमधील सर्व मानाच्या पालख्या ज्या मार्गावरुन जातात त्या मार्गावरील सा.बां.विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व राष्ट्रीय महामार्ग/राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचे पथकर स्थानकांवर मानाच्या पालख्यांना व वारकरी तसेच भाविकांच्या वाहनांना दिनांक ०३/०७/२०२४ ते २१/०७/२०२४ या कालावधीत पंढरपुरला जाते व येते वेळी महाराष्ट्र शासन निर्णय क्र खाक्षेस-२०२२/प्र.क्र.३१/रस्ते-९अ चे परिपत्रकान्वये पथकरात सुट देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय अंमलबजावणीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड येथुन पंढरपुरला जाणारे भाविक, वारकरी तसेच पालख्यांच्या वाहनांना चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३ येथील वाहतुक मुख्यालयातुन तसेच पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेअंतर्गत असलेल्या वाहतूक विभागातून पथकर सवलत पास उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त, परि-२
अति.कार्य,वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२) प्रभारी अधिकारी सर्व वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड
/- पंढरपुरला जाणारे भाविक, वारकरी तसेच पालख्यांच्या वाहनांना पथकर सवलत पास उपलब्ध करुन द्यावे.

Scanned with CamScanner